**फौ.कि.अर्ज क्र.५८/२०२३**

## निशाणी १६ वरील आदेश

प्रस्तुत अर्जात जाबदेणार क्र.१ व ३ कथन करतात की, सदर अर्जामध्ये जाबदेणार क्र.१ व ३ यांना सदर अर्जास जबाब दाखल करणेकामी सुमारे ३५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर विलंब हा जाणुनबूजुन केलेला नाही. जाबदेणार क्र.१ हे घरातील कर्ता असुन त्यांच्यावर वयोवृध्द आई–वडील व दोन्ही मुलांची जबाबदारी आहे तसेच, जाबदेणार क्र.१ हे शेतीचे कामात व्यस्त असल्याने त्यांना मुदतीत जबाब दाखल करता आलेला नाही. सदर विलंब माफ केल्यास अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट मे.कोर्टास न्यायदानास मदत होईल याउलट सदरचा विलंब माफ न झाल्यास सदर जाबदेणार यांचे कधीही पैसाचे स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब, सदर अर्जास जाबदेणार क्र.१ व ३ यांना जबाब दाखल करण्यास झालेला विंलब माफ करण्यात यावा अशी न्यायालयास विनंती न्यायालयास केली आहे. सदर अर्जाच्या समर्थनार्थ जाबदेणार यांनी **नि.१७** प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. अर्जदारतर्फे सदर अर्जास म्हणणे देत असे कथन केले आहे की, जाबदेणार यांनी जबाब दाखल करण्यास जाणुनबूजुन विलंब केलेला आहे. मे.न्यायालयाने जाबदेणार यांना योग्य ती मुदत दिलेली होती. तरी मे.न्यायालयाने जाबदेणार यांना ५,०००/– रुपये दंड करण्यात यावा अशी न्यायालयास केली आहे.

३. प्रस्तुत अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे सरंक्षण कायदा २००५ चे कलम १२, १७, १८, २०, २२ व २३ प्रमाणे जाबदेणार क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द दाखल केलेला आहे. सदर जाबदेणार क्र.१ व ३ यांना अर्जास जबाब दाखल करण्यास ३५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर अर्ज गुणदोषांवर चालण्याकरिता जाबदेणार क्र.१ व ३ यांचा मुळ अर्जास जबाब येणे आवश्यक आहे.

सबब, नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता जाबदेणार क्र.१ व ३ यांना मुळ अर्जास जबाब दाखल करण्याची संधी देणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, या सर्व बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. जाबदेणार क्र.१ व ३ यांनी मुळ अर्जास जबाब दाखल करण्याकामी झालेला विलंब २००/- कॉस्टसहीत माफ करण्यात येत आहे.

३. जाबदेणार क्र.१ व ३ यांनी १००/– रुपये कॉस्ट विधी सेवा समिती, वडगांव मावळ व अर्जदार यांना १००/– पुढील कॉस्ट पुढील तारखेपर्यंत द्यावी.

सही/-

दि.०५/०१/२०२४

**(श्रीमती. किर्ती अ. देशपांडे)**

७ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

वडगांव मावळ, पुणे.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **Shri.Sagar V. Ingale** |
| Name of the court | : | **Smt.Kirtee A. Deshpande**<br>**7th Jt. CJJD & JMFC,**<br>**Vadgaon Maval, Pune** |
| Judgment/order declared on | : | **05/01/2024** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **05/01/2024** |
| Judgment/order uploaded on | : | **05/01/2024** |